**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १७.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाच्या समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४५ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. नारायण देविदास पंडित<br>प्लॉट क्र.७८, इंद्रायणी विद्या मंदिर कॉलनी,<br>चारूण रोड, तळेगाव दाभाडे, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी तथा कायदा अधिकारी<br>पुणे विद्यापीठ, पुणे-४११ ००७ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे-४११ ००७ | गैरहजर |

सन १९६५ ते १९९५ या कालावधीमधील माजी कर्मचारी व त्यांच्या सेवेविषयी व पर्यवेक्षण भत्याविषयी माहिती अपीलकर्ता श्री. नारायण देविदास पंडित यांनी दि. २२.२.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती दिली. प्रमाणसंहिता १९८४, नियम क्र.९(६) मधील तरतुदीनुसार सेवा पुस्तिका जतन केली जात नाही. ती संबंधित कर्मचाऱ्यांना परत करण्यात येतात, तशी देण्यात आली आहेत. त्यामुळे ऊर्वरित माहिती देता येणार नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले. अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १८.५.२००८ रोजीचे निर्णयाने ते मान्य केले. आयोग हा निर्णय कायम करीत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील अमान्य.

पुणे
दि. २९.११.२००८

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१२.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७०+१४८८ / पुणे / २००७ | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.फिरोज अल्लाउद्दीन जमादार<br>अलहाजी अपार्टमेंट, तळमजला, फ्लॅट नं.२,<br>आफरीन पार्क, गोवळकोट रोड,<br>चिपळूण, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहा.आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे | हजर |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.फिरोज अल्लाउद्दीन जमादार यांनी दि.२२.२.२००७ रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्याकडे डी.एड.(उर्दू)परीक्षा नोव्हेंबर २००६ च्या स्वत:च्या व अन्य काही विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती.

उभय बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेता, अपील क्र.१०७० व १४८८ मधील अपीलकर्त्याची मागणी सारखीच आहे. अपील क्र.१४८८ चा दि.२१.१०.२००८ रोजी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त समावेश होता. उत्तरपत्रिकांच्या प्रती देता येणार नाहीत, तसेच अन्य विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका ही त्रयस्थ पक्षाची माहिती आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी

माहिती नाकारताना नमूद केले आहे. तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने, व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ यांनी दि.१४.३.२००७ रोजी घेतलेला उत्तरपत्रिकांच्या प्रती न देण्याचा निर्णय कायम करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.११.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१६.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३६ / पुणे /२००७ | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.अरविंद तुकाराम शिंदे<br>१०, ससून रोड, पुणे स्टेशन, ४११००१ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपअधीक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे | हजर |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अरविंद तुकाराम शिंदे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांच्याकडे दि.३.२.२००७ रोजीचे अर्जान्वये लाड व पागे समिती, शासन [illegible]ाप्रमाणे व शासन आदेश दि.९.१.२००३ प्रमाणे नोकरी व पदोन्नती मिळण्याबाबत प्रश्नांची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि.३.४.२००७ रोजीचे पत्रान्वये अपीलकर्त्यास रु.१०/- माहितीसाठी शुल्क भरावे व माहिती घेऊन जावी, असे कळविले. त्याप्रमाणे शुल्क भरल्यानंतर दि.३.४.२००७ रोजीच अपीलकर्त्यांच्या प्रतिनिधीकडे माहिती देण्यात आली.

त्यावर अपीलकर्त्याने दि.१०.४.२००७ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांच्याकडे अपील दाखल केले. याबाबत अपिलीय प्राधिकारी यांनी

अपीलकर्त्याबरोबर चर्चा करुन दि.१८.८.२००७ रोजीचा कार्यवृत्तांत सादर केला आहे. त्याची प्रत अपीलकर्त्याच्या प्रतिनिधीस दिल्याचे नमूद आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द दि.१७.९.२००७ रोजी अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

या अपिलाचा दि.१६.७.२००८ राजीचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त समावेश करण्यात आला होता. त्यात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यात आली आहे. तसेच प्रथम अपिलात चर्चा झाल्याप्रमाणे दि.१८.८.२००७ रोजी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची चर्चा झाली. मूळ प्रश्न श्री.उमेश सुरेश बिवाल यांच्या नोकरीबाबतचा आहे. त्या संदर्भात सचिव, वैद्यकीय शिक्षण यांना पत्र देणे व मार्गदर्शन मागविणे व त्याची प्रत समाजकल्याण संचालनालयाला देऊन त्यांचेही मार्गदर्शन घेऊन पुढील कार्यवाही करण्याचे ठरले, हरकत असणाऱ्या नावांव्यतिरिक्त ऊर्वरित सर्व नियुक्त्यांबाबत शक्य तितक्या लवकर कार्यवाही करणे, शैक्षणिक अर्हतेप्रमाणे सामावून घेण्याबाबत उल्लेख आहे, परंतु सध्याचे आरक्षण पध्दतीनुसार इतर संवर्गात सरळसेवा भरतीची अडचण निर्माण होते, त्यामुळे मेहतर काम करणाऱ्यांच्या वारसांना शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन इतर संवर्गातही नियुक्ती द्यावी किंवा कसे याबाबत स्वयंस्पष्ट मार्गदर्शन मागविण्याचे ठरविले, तसेच माहिती उशिरा देणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय यांनी श्री.अरविंद शिंदे यांना दि.१८.८.२००७ रोजीच्या पत्राने कळविले आहे.

माहिती अपुरी, खोटी व दिशाभूल करणारी आहे, असे श्री.अरविंद शिंदे यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे. मूळ अर्जातील कार्यवाहीचा विषय, जन माहिती अधिकारी यांनी दि.३.४.२००७ रोजीचे निवेदनाद्वारे दिलेली माहिती, अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१८.८.२००७ रोजी दिलेले पत्र व माहितीबाबत केलेली कार्यवाही विचारात घेता अपील निकाली काढण्यास पात्र ठरत आहे. नोकरी देण्याबाबतचा विशय प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जास्तीतजास्त ४५ दिवसात निर्णय घेणे आवश्यक होते. त्याबाबत दक्षता घेण्याची त्यांना समज देण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९.११.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**


राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१


राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १७.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. गणेश अशोक कांबळे<br>रा. इमारत क्र.एल-५२/१२५३, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, येरवडा, पुणे-४११ ००६ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव, ता.आंबेगाव, जि. पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे विभाग, पासपोर्ट बिल्डिंग रोड क्र.१६, ठाणे | गैरहजर |

नवीन उमेदवारांना कायम स्वरूपी नोकरी देण्याचे कारण काय, त्याबाबतचे निकष व मुलाखतीच्या झेरॉक्स प्रती अशी माहिती अपीलकर्ता श्री. गणेश अशोक कांबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव यांच्याकडे दि. १.६.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितली होती.

सदर अपिलासंदर्भात दि. ९.६.२००८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सुनावणीत अपीलकर्त्याबरोबर चर्चा झाली. श्री. कांबळे यांना तीन-तीन महिन्यासाठी तांत्रिक सेवाखंड देऊन नेमणूक दिली होती. यास्तव कायमस्वरूपी हक्क सांगता येत नाही, असे सांगून अपील निकाली काढण्याचे ठरले. त्याबाबतचे तसे इतिवृत्त तयार केले, त्यास अपीलकर्त्याने मान्यता दिली, असे अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१७.७.२००८ रोजीच्या पत्रान्वये नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २८.११.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामेश्वर पाटीलबा नागरे
उपशिक्षक, मामासो. बहु.प्रशाला,
वाशेरे, ता.खेड, जि.पुणे

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
कै.मामासाहेब मोहोळ विद्या विकास मंडळ, पुणे-३०

(१) **जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
माध्यमिक विद्यालय, सायगाव, ता.खेड, जि.पुणे
(२)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, मामासो. मोहोळ बहु.प्रशाला,
वाशेरे, ता.खेड, जि.पुणे

उत्तरवादी

| | |
|---|---|
| १ अपील क्रमांक | १२०१+१२०२ / अपील / पुणे |
| २ सुनावणीची तारीख | दि.१७.७.२००८ |

३ <u>उपस्थित</u>

**अपीलकर्ता** श्री.रामेश्वर पाटीलबा नागरे
उपशिक्षक, मामासो. बहु.प्रशाला,
**वाशेरे, ता.खेड, जि.पुणे**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
कै.मामासाहेब मोहोळ विद्या विकास मंडळ, पुणे-३० श्री.जी.पी.ढाकणे

(१) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय
सायगाव, ता.खेड, जि.पुणे विद्यमान श्री.बी.एम.कोरडे
(२)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, मामासो. मोहोळ बहु.प्रशाला,
वाशेरे, ता.खेड, जि.पुणे श्री.हनुमंत बळीराम लोंढे

| | |
|---|---|
| ४ जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.१.२००७ व ४.२.२००७ |
| ५ जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.६.२००७ व १३.३.२००७ |
| ६ प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.४.२००७ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

माहे सप्टेंबर २००६ च्या पगारपत्रकाची साक्षांकित प्रत, श्री.जायभाये, वरिष्ठ लिपीक व मामासाहेब संस्थेतील इतर अपंग कर्मचारी शासनाचे लाभ घेत आहेत त्यांच्या प्रमाणपत्राच्या प्रती. श्री.जायभाये यांनी सन २००५-२००६ मध्ये ओ डी वर असताना त्यानी प्रवास केला या प्रवासाची तिकिटे व्हाऊचर, भाड्याची रक्कम. विद्यालयातील, संस्थेतील इतर शाखेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती, पदोन्नती आदेशाच्या प्रती. विद्यालयातील /संस्थेतील श्री.कोरडे, लोंढे व इतर यांच्या नेमणूक व पदोन्नती मान्यतेच्या साक्षांकित प्रती. माझी नेमणुकीची मूळ प्रत. सन १९९४-९५ व १९९५-९६ च्या सेवाज्येष्ठता याद्याच्या नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान येथील साक्षांकित प्रती.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रामेश्वर पाटीलबा नागरे यांनी मामासाहेब मोहोळ विद्या विकास मंडळ, पुणे संचलित विद्यालयांमधील जून १९८३ पासूनची शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मामासो. मोहोळ बहु.प्रशाला, वाशेरे, ता.खेड, जि.पुणे व मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, सायगाव, ता.खेड यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन ती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.नागरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश दि १७.७.२००८ रोजी केलेला होता. परंतु तीनही घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.१७.७.२००८ रोजी या अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

गेली दीड वर्षात आपल्याला कोणतीही माहिती मिळालेली नाही, असे श्री.पाटील यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. उपलब्ध कागदपत्रानुसार माहिती तात्काळ देण्यात आली व उपलब्ध नसलेल्या माहितीबाबत कळविण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मामासो. मोहोळ बहु.प्रशाला, वाशेरे, ता.खेड, जि.पुणे श्री.एच.बी.लोंढे व मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, सायगाव, ता.खेड श्री.बी.एम.कोरडे यांनी नमूद केले. श्री.नागरे यांनी मागितलेली माहिती १० वर्षांपूर्वीची आहे. एस.एस.कोड नुसार दहा वर्षांपूर्वीचे अभिलेख नष्ट करण्यात आले आहेत. श्री.नागरे यांनी वेगवेगळ्या तारखांना पत्र पाठविल्याचे नमूद केले असले तरी ही पत्रे आपल्याला मिळालेली नाहीत. आयोगाकडून विचारणा झाल्यानंतर त्याबाबतची माहिती तयार ठेवण्यात आली. तसेच श्री.नागरे यांनी प्रथम अपील केलेले नाही, असे जन माहिती अधिकारी श्री.बी.एम.कोरडे, श्री.एच.बी.लोंढे व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, कै.मामासाहेब मोहोळ विद्या विकास मंडळ, पुणे श्री.जी.पी.ढाकणे यांनी सांगितले. संबंधित पत्राच्या छायांकित प्रती मिळाल्यास माहिती त्वरित देता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या पत्रानुसार तयार असलेली माहिती सुनावणीच्या दिवशीच श्री.नागरे याना रजिस्टर टपालाने पाठविल्याचे निवेदन त्यांनी आयोगाला सादर केले.

अपील क्र.१२०२ मधील अर्जातही स्वतःला माहिती मिळालेली नसल्याचे श्री.नागरे यांनी नमूद केले. त्यात प्रथम अपील करण्याबाबत आयोगानेही दि.४.८.२००७ च्या पत्रान्वये श्री.नागरे यांना कळविले होते. परंतु त्यांनी ते केलेले नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता एस.एस.कोडनुसार नष्ट केलेले अभिलेख दिले जाणार नाहीत. मात्र त्यानंतरची माहिती द्यावयास हवी होती, ती देण्यात आली आहे. मूळ पत्रे आपल्याला मिळालेली नाहीत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय

अधिकारी यांचे म्हणणे आहे, तर त्याची पोहोच आपल्याकडे असल्याचा अपीलकर्त्याचा दावा आहे. अशी पोहोच सादर करण्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले होते. परंतु सुनावणीनंतर दोन महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतरही त्यांनी ती सादर केलेली नाही. ही बाब गंभीर असून श्री.नागरे यांचा दावा त्यामुळे निराधार ठरतो.

## आदेश

अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१.११.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १७.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२० / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. संजीव नागनाथ माळी<br>देवेश्री हाईटस्, फेज दोन, फ्लॅट नं.८, मंत्री टाऊनशिप रोड, प्रोग्रेसिव्ह मॉडेल कॉलनी, वैदूवाडी, हडपसर, पुणे-१३ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्राचार्य, गोविंदराव पवार विद्यालय व ज्युनियर कॉलेज, भवानीनगर, ता.इंदापूर, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सचिव, फुले एज्युकेशन सोसायटी, इंदापूर, जि. पुणे | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. संजीव नागनाथ माळी यांनी दि. ३०.४.२००७ रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, गोविंदराव पवार विद्यालय व ज्युनियर कॉलेज, भवानीनगर, ता. इंदापूर यांच्याकडे सदर कॉलेज मधील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या १९८९ पासून १९९५ पर्यंतच्या प्रत्येक शैक्षणिक वर्षीच्या कर्मचारी संच मान्यतांच्या साक्षांकित प्रती व तत्संबंधी ११ मुद्दयांची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ७.५.२००७ रोजीचे पत्रान्वये माहितीचे पोटी अपीलकर्त्यास रू.३९००/- भरणेस कळवूनही भरले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे. तसेच शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करून देण्याचे भाष्य केले आहे. अपीलकर्त्याने शुल्क न भरता प्रथम व द्वितीय अपील केले आहे. अपीलकर्त्याची ही कृती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
दि. २९.११.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. संजय जगन्नाथ बारबोले — अपीलकर्ता
४०६३, तुळजापूर रोड, बार्शी, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता.
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२१/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.५.२०० |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. --- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. --- |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.०८.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहे मार्च २००० ते मे २००० या कालावधीतील अभियंता श्री. एस. जे. शेख व श्री.आर.के.शेख यांची दैनंदिनी, प्रवास भत्ता बील पगार सबंधित माहिती, तसेच श्री. एस.ए.सुरवसे (अभियंता) यांची एप्रिल २००१ ते जून २००१ पर्यंत याप्रमाणे माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संजय जगन्नाथ बारबोले यांनी अनुक्रमे श्री. एस. जे. शेख, श्री. आर के शेख व श्री. एस.ए.सुरवसे, अभियंता यांची दैनंदिनी, प्रवास बील व पगाराबाबतची माहिती मागितली होती.

आवश्यक माहिती न मिळाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले होते. दरम्यानच्या काळात माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्ता श्री. बारबोले यांनी दि. १२/११/२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२९.११.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. अंकुश सिताराम गायकवाड — अपीलकर्ता
३२३/७,उमा गृहनिर्माण संस्था, जुनी मिल कंपाऊंड, सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष कार्यकारी अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगरअभियंता,
सोलापूर महानगरपालिका , सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२८/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.०८.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.०८.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.०९.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.१०.२००८ |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती.</u>**<br><br>प्राथमिक सुविधा(लाईट,पाणी,रस्ते) नसताना टी. पी. ४/एफ. पी .१२५/२ ला बांधकाम परवानगी का देण्यात आली ? | |

<u>विवेचन</u>

प्राथमिक सुविधा नसताना बांधकामास परवानगी का देण्यात आली, या बाबतची माहिती अपीलकर्ता श्री. अंकुश सिताराम गायकवाड यानी जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे मागितली होती.

सदर अपिलाची छाननी केली असता,खुलासा,अभिप्राय मागणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र संबंधित बांधकामास दिलेल्या परवानगीबाबतची कागदपत्रे अपिलकर्त्यास देणे उचित ठरेल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) मूळ अर्जात नमूद केलेला बांधकाम परवाना देण्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी अपीलकर्त्यास,आदेश मिळाल्यापासून आठ दिवसांत उपलब्ध करून द्यावी व अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि.२९.११.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मुकुंद शामराव मोहिते
विठ्ठल मंदिरासमोर, मारुती रोड, सांगली-४१६४१६ अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
म्हैसाळ विद्युत व यांत्रिकी विभाग, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी [illegible] अभियंता,
उभारणी मंडळ, कोल्हापूर उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९ / अपील / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२००८ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
म्हैसाळ विद्युत व यांत्रिकी विभाग, सांगली श्री.एक.के.मुलाणी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
उभारणी मंडळ, कोल्हापूर श्री.चं.बं.गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१३.११.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३०.१२.२००६ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

म्हैसाळ टप्पा क्र.४ व ५ साठी उभारण्यात आलेली एकेरी पारेषण वाहिनीबाबतची तांत्रिक व आर्थिक माहिती व त्यापोटी अदा केलेल्या रकमेबाबत.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.मुकुंद शामराव मोहिते यांनी सांगली विद्युत भागातील म्हैसाळ टप्प्यामधील कामासंबंधी माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, म्हैसाळ विद्युत व यांत्रिकी विभाग, सांगली यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती अपुरी असल्याच्या कारणावरुन श्री.मोहिते यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उभारणी मंडळ, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. तेथेही ऊर्वरित माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.मोहिते यानी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सांगली येथील दि.१४.५.२००८ रोजीच्या 'विशेष निर्गत अपील कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता हे गैरहजर होते, म्हणून दि.१२.११.२००८ रोजी पुणे येथे सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला मोजमाप पुस्तकाची प्रत मिळालेली नाही, असे श्री.मोहिते यांनी आयोगाला दि.३०.१०.२००८ रोजी पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे. मात्र श्री.मोहिते यांना मूळ माहिती आठ दिवसात देण्यात आली. त्यानंतर त्यांना अपुरी वाटणारी माहिती प्रथम अपिलातील निर्णयानंतर पुन्हा देण्यात आली. अर्जात नसलेल्या व नंतर त्यानी उपस्थित केलेल्या मूळ मुद्दयाचे स्पष्टीकरण त्यांना देण्यात आले. कोणत्याही सुनावणीला ते हजर नव्हते, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.चं.बं.गायकवाड व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता

श्री.एस.के.मुलाणी यांनी दि.२.११.२००७, दि.६.११.२००७, १५.११.२००७, २३,११,२००७ अशा विविध निवेदनाद्वारे विस्ताराने पूरक कागदपत्रांसह सादर केले. मोजमाप पुस्तकातील नोंदीच्या छायांकित प्रती श्री.मोहिते यांना पाठविण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मात्र 'माझ्या माहितीप्रमाणे राज्य शासन या कामाबाबत चौकशी करत आहे. सदर माहिती मिळणेसाठी झालेला प्रदीर्घ विलंब व शासकीय पातळीवर सुरु असणारी कारवाई विचारात घेता मला या प्रकरणात ही माहिती मिळविण्यासाठी काहीही स्वारस्य राहिलेले नाही', असे श्री.मोहिते यांनी दि.३०.१०.२००८ राजी आयोगाला पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे. कार्यव्यस्ततेमुळे सुनावणीला आपण उपस्थित राहू शकत नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सर्व माहिती दिल्याचे पूरक कागदपत्रांसह सादर केले आहे. ते लक्षात घेता व श्री.मोहिते यांचे दि.३०.१०.२००८ चे निवेदन लक्षात घेता आयोगाचा आदेश खालीलप्रमाणे:

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९.११.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग; पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. शिवनिंग लक्ष्मण सिदरेड्डी — अपीलकर्ता
रा. कोळगिरी, पो. सनमडी, ता. जत, जि.सांगली

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अधीक्षक, भूमि अभिलेख,
जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, जत
ता. जत, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३० / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.१२.२००६ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.१.२००७ |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.३.२००७ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौजे वळसंग येथील भूमापन क्र. ६८६ मधील हिश्याची मोजणी करणेकामी वादीने रक्कम भरली होती. प्रतिवादी असो वा नसो वादीतर्फे मोजणी करून देण्याचे अधिकार आहेत किंवा नाहीत, मोजणीच्या तारखेवेळी पंचांचे जाब जबाबाची नक्कल, तहसीलदार यांचे आदेशाची नक्कल, मोजणीबाबत कोणती कारवाई केली या संदर्भात माहिती | |

## विवेचन

भूमापन मोजणी संदर्भात अपीलकर्ता श्री. शिवनिंग लक्ष्मण सिदरेड्डी यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ खाली माहिती मागितली होती. हा कायदा निरसित झाल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, जत यांनी अर्ज फेटाळला. त्याविरूध्द

अपीलकर्ता यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर योग्य ठरवून त्यांनी अपील फेटाळले.

महाराष्ट्राचा कायदा कोणत्या परिपत्रकानुसार निरसित झाला ती माहिती दिली नाही, अशा स्वरूपाच्या कारणांवरून श्री. सिदरेड्डी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. दि. १४.५.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये सदर अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंचे एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

श्री. सिदरेड्डी यांचा संबंधित जमीन मोजणीशी संबंध नाही. ही जमीन त्रयस्थ पक्षाची आहे. वारसाच्या हक्कावरून असलेल्या वादासंदर्भात तहसीलदार, जत यांच्याकडे वाटपाचे प्रकरण प्रलंबित आहे, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'चे वेळी प्रपत्रात नमूद केले होते. त्याचा त्यांनी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत पुनरूच्चार केला. संबंधित भूमापन क्रमांकाशी अपीलकर्त्याचा कोणताही मालकी संबंध नाही. लगतच्या जमिनीचे ते मालक आहेत. दि. २३.११.२००६ रोजी तहसीलदार, जत यांच्याकडे वारस नोंदीच्या अनुषंगाने प्रकरण पाठविण्यात आले असून आपल्या कार्यालयाकडे ते अद्याप परत प्राप्त झालेले नाही, असेही अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख श्री. व्ही.एन.परदेशी यांनी स्पष्ट केले.

संबंधित माहिती अन्य व्यक्तीच्या जमिनी संदर्भातील आहे व मुख्य विषय वाटपाच्या वादाबद्दलचा आहे. हे लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये 'माहिती' म्हणून वरील मागणीची नोंद घेण्याचे कारण नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १५.११.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४०७ / पुणे | श्री. महेंद्र उमेदमल रांका ८५१/५, भवानी पेठ, पुणे-२ | पोलीस निरीक्षक, समर्थ पोलीस स्टेशन, पुणे | उपायुक्त, परिमंडल-१ कार्यालय, फरासखाना पुणे-२ | श्री.प्रकाश शेषराव पाटोळे, पुणे यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या जबाबाच्या प्रती व त्यावेळी सादर करण्यात आलेल्या कागदपत्राच्या प्रती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपील-कर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १४०८ / पुणे | श्री. महेंद्र उमेदमल रांका ८५१/५, भवानी पेठ, पुणे-२ | पोलीस निरीक्षक, समर्थ पोलीस स्टेशन, पुणे | उपायुक्त, परिमंडल-१ कार्यालय, फरासखाना, पुणे-२ | श्री. सावळाराम भिमाशंकर घोरपडे, पुणे यांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या जबाबाच्या प्रती व त्यावेळी सादर करण्यात आलेल्या कागदपत्राच्या प्रती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | १५९८/ पुणे | श्री. महेंद्र उमेदमल रांका | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे | उपायुक्त, परिमंडल-१ कार्यालय, फरासखाना, पुणे-२ | सीआर क्र.३२२/०६ गुन्ह्या संबंधात माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १६४३ / पुणे | श्री. शाबाजी तुकाराम काळे मु.काळेवाडी, पो.चऱ्होली बु. ता.हवेली, जि. पुणे | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, राजगुरूनगर, ता.राजगुरूनगर जि. पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राजगुरूनगर, ता.राजगुरूनगर जि. पुणे | सन १९६० ते सन १९७२ या कालावधीतील मौजे साक्षेवाडी, जिल्हा परिषद, शाळा तपासणीचा दिनांक, शाळा शेरेबुक व शिक्षक हजेरीच्या नकला इत्यादी माहिती | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | १६४८ / पुणे | श्री. रमेश स. फोंडगे ५४-ब, हनुमान नगर, पुणे-१६ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मालवण, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग | तहसीलदार, तहसील कार्यालय, मालवण, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग | मौजे पारवाडी-आचरे, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग येथील जुना सर्व्हे क्र.६९, नवा सर्व्हे क्र.७५ बाबत माहिती | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | १६५२ / पुणे | श्री. अरविंदराव एस. सुर्वे ई-७१, अनुबंधनगर को.ऑप.हौसिंग सोसायटी, रामकृष्ण मठाजवळ, दांडेकर पूल, सिंहगड रोड, पुणे-३० | नगर भूमापन अधिकारी क्र.१, खडकमाळ आळी, हवेली तहसील कार्यालय, पुणे-१ | अधीक्षक, भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१ | सिटी सर्व्हे क्र. १३१/अ, हिस्सा १/सी/२अे/१ व २ पर्वती - टिपण बुक व फाळणी नकाशा | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ७ | १९६५/ पुणे | श्री. सुनिलकुमार बावधनकर, द्वारा चोपडे एजन्सी अॅन्ड कन्सलटीज, हिरामण बांडे बिल्डिंग, पुणे मुंबई रोड, कासार-वाडी, पुणे-३४ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, खंडाळा, ता.खंडाळा, जि. सातारा | तहसीलदार, तहसील कार्यालय, खंडाळा, ता.खंडाळा, जि. सातारा | श्री. प्रभाकर दत्तात्रय जोशी, लोणंद यांनी दि. २४.१२.२००७ रोजीच्या तक्रारीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ८ | १९८६ / पुणे | श्री. पोपट गोविंदराव टेमगिरे १०/५, कल्याण पेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे | शाखा उप अभियंता, बांधकाम विभाग (उत्तर) जिल्हा परिषद, पुणे-१ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (उत्तर) जिल्हा परिषद, पुणे-१ | सन १९६५ ते सन २००४ या कालावधीतील सहाय्यक कनिष्ठ अभियंता यांच्या ज्येष्ठतेच्या अनुषंगाने तीन मुद्दयांची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | १८६९ / पुणे | श्री. प्रविण भिमराव कदम द्वारा श्री. रविंद्र सदाशिवराव यादव स.नं.१५०/३ मोहनवाडी, आळंदी रोड, येरवडा, पुणे-६ | सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, बिबवेवाडी, पुणे | सह जिल्हा निबंधक वर्ग-१, मुद्रांक जिल्हाधिकारी शासकीय छायाचित्रण कार्यालय, पुणे-१ | दस्त क्र.४२६६ नोंदणी दि.२१.६.१९८२ हवेली नं.२ बाबत एकूण सहा मुद्दयांची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्यांने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| १० | १८३५ / पुणे | श्री. माधव शंकर पिसाळ रा.स.नं.३००/६, काशिनाथ पाटील नगर, धनकवडी, पुणे-४११ ०४३ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, जावली, ता.जावली, जि. सातारा | तहसीलदार, तहसील कार्यालय, जावली, ता.जावली, जि. सातारा | दि. ३.१२.१९८५ व दि. ११.१९८६ रोजीच्या सोबत करण्यात आलेल्या लेखी पुराव्याची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्यांने प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील सर्व अपिले (क्र.१४०७, १४०८, १५९८, १६४३, १६४८, १६५२, १९६५, १९८६, १८६९ व १८३५) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. २९.११.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**